(का.प.क्र.०७)

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

**दिनांक १९.०३.२००८ रोजी (का.प.क्र.०७) संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

बुधवार दिनांक १९ मार्च २००७ रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे दुपारी ४-४५ वाजता "वंदेमातरम" या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त तसेच नगरसचिव यांचेसह संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
०२. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
०३. स.स.श्री.संतोष सुधाकर जेजुरकर
०४. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०५. स.स.श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सीताराम इसराम
०७. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०८. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०९. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१०. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
११. स.स.श्रीमती आशन्ना लक्ष्मी शंकर
१२. स.स.श्रीमती मसरद बेगम शरफोद्दीन
१३. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१४. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१५. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१६. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
१७. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
१८. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
१९. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
२०. स.स.श्रीमती मिराताई रामराव शिंदे
२१. स.स.सौ.दिपाली सुनिल पाटील
२२. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२३. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
२४. स.स.श्रीमती खान अजरा जबीन मसुद खान
२५. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२६. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२७. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
२८. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
२९. स.स.श्री.अ.रशिद खान (मामु) हमीद खान
३०. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल

(का.प.क्र.०७)

३१. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३२. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३३. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन खान
३४. स.स.श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनुस
३५. स.स.श्री.खान निसार मोहमंद खान
३६. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
३७. स.स.श्री.दत्ताभाऊ अण्णासाहेब पाथ्रीकर
३८. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
३९. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
४०. स.स.श्री.मोतीवाला अश्रफ म.युनुस
४१. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४२. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
४३. स.स.श्रीमती खान जहुरबी नासेर
४४. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
४५. स.स.श्री.डॉ.कराड भागवत किसनराव
४६. स.स.सौ.रेखा कैलास काथार
४७. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
४८. स.स.श्रीमती डॉ.आशा उत्तमराव बिनवडे
४९. स.स.श्री.खुडे विजय किसनराव
५०. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
५१. स.स.श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
५२. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
५३. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
५४. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
५५. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
५६. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
५७. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
५८. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
५९. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
६०. स.स.श्री.जोशी संजय रामदास
६१. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
६२. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
६३. स.स.श्री.संजय पांडुरंग शिरसाट
६४. स.स.सौ.अल्पा विकास जैन
६५. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
६६. स.स.श्रीमती मोमीन सोफिया फिरदोस अय्युबखान
६७. स.स.सौ.अनिता नंदकुमार घोडेले

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य</u>**

०१. स.स.श्री.किशोर बाबुलाल तुलशीबागवाले

**(का.प.क्र.०७)**

**<u>विषय क्र. १८३ :</u>**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० (३) अन्वये स्थायी समितीच्या रिक्त होणा-या आठ (०८) सदस्यांच्या जागेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१- अ अन्वये पालिका सदस्यांतून ८ (आठ) सदस्यांची नियुक्ती करणे.

मा.पिठासीन अधिकारी :नगर सचिव यांनी या निवडणुकी संबधीत नियम वाचून दाखववावे.

नगर सचिव : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २० (३) अन्वये स्थायी समितीच्या सदस्यांपैकी निम्मे सदस्य पूढील प्रत्येक वर्षी पोट कलम (२) मध्ये उल्लेख केलेली महापालिकेची पहिली सभा ज्या महिन्यात भरेल त्या महिन्याच्या पहील्या तारखेस दूपारी निवृत्त होतील.

२० (४) पोट कलम (२) अन्वये निवडून आल्यानंतर एक वर्षाने पोट कलम (३) अन्वये कोणते सदस्य निवृत्त होतील ते पोट कलम (३) मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या त्यांच्या निवृत्तीच्या तारखेपूर्वी स्थायी समितीचा सभापती ठरविल अशावेळी व अशारितीने चिठ्ठ्या टाकून ठरविण्यांत येईल आणि त्यानंतर पुढील वर्षी स्थायी समितीचे जे सदस्य आपल्या पदावर जास्तीत जास्त काळ पर्यंत असतील ते निवृत्त होतील.

परंतू पुन्हा नेमण्यात आलेल्या सदस्यांच्या बाबतीत या पोटकलमाच्या प्रयोजनासाठी त्यांच्या पदाची मुदत त्यांच्या फेरनेमणूकीच्या तारखेपासून मोजण्यात येईल.

कलम ३१ अ. प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून समित्यावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त करणे.-

(१) कोणत्याही समितीवरील पालिका सदस्यांची नियुक्ती ही त्याने धारण केलेल्या कोणत्याही पदाच्या आधारे असेल अशी ज्याबाबतीत या अधिनियमाद्वारे तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही,पुढील समित्यांच्या बाबतीत या अधिनियमात अथवा तदन्वये केलेल्या नियमात किंवा उपविधीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेद्वारे या समित्यांवर केली जाणारी पालिका सदस्याची नियूक्ती ही, पोट-कलम (२) च्या तरतूदीनुसार पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करून करण्यांत येईल मग ही नियुक्ती नियमित पदावरील असो किंवा नैमित्तिक रिक्त पदावरील असो.

(अ) स्थायी समिती

(ब) परिवहन समिती

(क) कलम ३० अन्वये नियुक्त केलेली कोणतीही विशेष समिती

(ड) कलम ३१ अन्वये नियुक्त केलेली कोणतीही तदर्थ समिती

(२) समितीवर पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करतांना, महानगरपालिका, मान्यता प्राप्त पक्षाचे अथवा नोंदणीकृत पक्षाचे किंवा गटाचे तौलणिक संख्याबळ विचारात घेईल आणि सभागृह नेता, विरोधी पक्षनेता व अशा प्रत्येक पक्षाचा किंवा गटाचा नेता

(का.प.क्र.०७)

यांच्याशी विचारविनिमय करून शक्यतोवर, महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करील.

परंतू या पोट कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीचा, तिच्यामूळे अशा कोणत्याही पक्षाच्या किंवा गटाच्या नसणाऱ्या कोणत्याही सदस्याचे समितीवर नामनिर्देशन करण्यास महापालिकेला प्रतिबंध होतो असा अर्थ लावला जाणार नाही.

परंतू आणखी असे की, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम, १९८६ (१९८७ चा महा.२०) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये मान्यता प्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट यांचे तौलनिक संख्याबळ निश्चित करण्याच्या प्रयोजनाकरीता, निवडणूक निकालांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीच्या आत, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट अथवा कोणत्याही पक्षाचे किंवा गटाचे नसलेले निर्वाचित पालिका सदस्य यांना एकत्र येवून आघाडी किंवा फ्रंट तयार करता येईल आणि अशा आघाडीची किंवा फ्रंटची नोंदणी झाल्यावर अशा आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यांना उक्त अधिनियमाच्या तरतूदी, जणू काही ही आघाडी किंवा फ्रंट निवडणूकी पुर्वीच नोंदणीकृत असल्याप्रमाणे, लागू होतील.

(३) अशा पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशीत करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, त्याबाबतीत, महापालिकेचा निर्णय अंतिम असेल.

अशी तरतूद आहे.

सार्वत्रिक निवडणूक २००५ नंतर औरंगाबाद महानगरपालिकेची पहिली सर्वसाधारण सभा दिनांक २९ एप्रिल २००५ रोजी संपन्न झालेली आहे.

सार्वत्रिक निवडणूक २००५ नंतर संपन्न झालेल्या पोट निवडणूका विचारात घेता औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये सद्यस्थितीत पक्ष निहाय सदस्य संख्या खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| * | शिवसेना | - | २६ |
| * | भारतीय जनता पक्ष | - | २२ |
| * | इंडियन नॅशनल कॉंग्रेस | - | २० |
| * | नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी | - | १३ |
| * | अपक्ष | - | ११ |

**<u>इतर</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| * | आर.पी.आय. (डेमोक्रॅटीक) | - | ०१ |
| * | आर.पी.आय. (अे) | - | ०१ |
| * | बहुजन समाज पार्टी | - | ०१ |
| * | पिपल्स रिपब्लीकन पार्टी | - | ०१ |
| * | भारिप बहुजन महासंघ | - | ०२ |

(का.प.क्र.०७)

अधिनियमाचे कलम २० (४) च्या तरतूदीनुसार सन २००७-२००८ मधील १६ स्थायी समिती सदस्यांमधून खालील ८ स्थायी समिती सदस्य दिनांक ०१ एप्रिल २००८ रोजी दूपारनंतर निवृत्त होत आहे.

०१. आशा उत्तमराव बिनवडे
०२. तुपे त्र्यबंक गणपतराव
०३. दाभाडे हिम्मतराव साळुबा
०४. बमणे पुनमचंद सोनाजी
०५. मो.जावेद मो.इसाक
०६. शिरसाट संजय पांडुरंग
०७. सावंत मधुकर दामोधर
०८. हाजी शेरखान अ.रहेमान

निवृत्त होणाऱ्या आठ स्थायी समिती सदस्यांच्या रिक्त जागा भरण्यासाठी मा.महापौर यांनी निश्चित केल्याप्रमाणे आज दिनांक १९ मार्च २००८ रोजी सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यांत आले असून या सभेमध्ये अधिनियमाचे कलम ३१- अ नुसार पालिका सदस्यांमधून आठ सदस्यांची स्थायी समितीवर निवड करावयाची आहे.

मा.पिठासीन अधिकारी : स्थायी समितीच्या आठ सदस्य पदासाठी राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीचे गट नेता यांनी स.स.सौ.मोमीन सफिया फिरदोस अयूबखान,भारतीय जनता पार्टीचे गटनेता यांनी स.स.श्री.नारायण तिलोकचंद कुचे व स.श्री.सिताराम इसराम सुरे तर नॅशनल कॉग्रेस (आय) पक्षाचे विरोधी पक्ष नेता यांनी स.स.श्री.जावेद हसन खान व स.स.श्री.दत्ताभाऊ अण्णासाहेब पाथ्रीकर, तर शिवसेना पक्षातर्फे मा.सभागृह नेता यांनी स.स.श्री.कटकटे सतीश विश्वनाथ,श्री.गवळी रविकांत काशिनाथ,श्री.सोनवणे कचरू श्रीपत, यांची नावे प्राप्त झालेली आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१-अ अन्वये महानगरपालिकेतील मान्यता प्राप्त पक्षाचे/नोंदणीकृत पक्षाचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून सभागृह नेता विरोधी पक्ष नेता व पक्षांचे गट नेता यांचेशी विचार विनीमय करून स्थायी समिती सदस्यासाठी खालील पालिका सदस्यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येते.

०१. सौ.मोमीन सफिया फिरदोस अयूबखान
०२. श्री.नारायण तिलोकचंद कुचे
०३. श्री.सिताराम इसराम सुरे
०४. श्री.श्री.जावेद हसन खान
०५. श्री.दत्ताभाऊ अण्णासाहेब पाथ्रीकर
०६. श्री.सतिश विश्वनाथ कटकटे
०७. श्री.रविकांत काशिनाथ गवळी
०८. श्री.कचरू श्रीपत सोनवणे

<u>ठराव :</u>

**(का.प.क्र.०७)**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१-अ अन्वये महानगरपालिकेतील मान्यता प्राप्त पक्षाचे/नोंदणीकृत पक्षाचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून सभागृह नेता विरोधी पक्ष नेता व पक्षांचे गट नेता यांचेशी विचार विनीमय करून स्थायी समिती सदस्यासाठी खालिल पालिका सदस्यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येते.

०१. सौ.मोमीन सफिया फिरदोस अयूबखान
०२. श्री.नारायण तिलोकचंद कुचे
०३. श्री.सिताराम इसराम सुरे
०४. श्री.श्री.जावेद हसन खान
०५. श्री.दत्ताभाऊ अण्णासाहेब पाथ्रीकर
०६. श्री.सतिश विश्वनाथ कटकटे
०७. श्री.रविकांत काशिनाथ गवळी
०८. श्री.कचरू श्रीपत सोनवणे

वैधानिक कार्यवाही व्हावी.

याचवेळी मा.पिठासीन अधिकारी (मा.महापौर) यांनी निवडून आलेले नवीन आठ स्थायी समितीच्या सदस्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.पिठासीन अधिकारी यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका
औरंगाबाद.